>> कंदपिके

# फळपिकांमध्ये कोणत्या कंदपिकांची लागवड करावी ?

– **प्रकाश ढोके**, सावर्डे, जि. रत्नागिरी

फळपिकांमध्ये आंतरपीक म्हणून कंदपिकांची योग्य निवड; तसेच कमी कालावधीच्या जातीची निवड करणे आवश्यक आहे. आंतरपिकांची लागवड करताना मुख्य पिकांचे वय, लागवडीचे अंतर, झाडाचा विस्तार, झाडाची ठेवण, मुळांचा विस्तार, मधल्या जागेतील सूर्यप्रकाशाची उपलब्धता, सिंचन सुविधा, जमिनीचा प्रकार, पिकांची कालावधी इत्यादी बाबींचा विचार करावा.

- आंबा व काजूमध्ये कंदपिकांची लागवड करताना शक्यतो जिरायती म्हणून लागवड केली जाते, त्यामुळे खरीप हंगामात आंबा व काजू बागेतील मधल्या जागेमध्ये उपलब्ध जागा व अन्य संसाधनांचा विचार करून कंदपिकांची लागवड करावी. त्यात कणगर, करांदा, घोरकंद यासाठी ९० सें.मी. अंतरावर; तर रताळी पिकासाठी ६० सें.मी. अंतरावर सऱ्या करून लागवड करावी. लागवडीवेळी झाडांची संख्या ठरविताना पुरेसा सूर्यप्रकाश व जमिनीचा प्रकार हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.
- अतिपावसाच्या प्रदेशात कंदपिकांची लागवड ही जमिनीचा उतार लक्षात घेऊन करावी. रताळ्यासारख्या पिकामुळे जमिनीवर आच्छादन तयार होऊन जमिनीची धूप कमी होते, तसेच पाणी व मृद संधारणाचे कामही होऊ शकेल.
- नारळाच्या बागेमध्ये ४५ ते ५० टक्के सूर्यप्रकाशाची उपलब्धता आंतरपिकांसाठी होऊ शकते. या दृष्टीने कंदपिकांची लागवड करताना पीकनिहाय झाडांची संख्या व लागवड पद्धतीत बदल करावेत. नारळ बागेत कंदपिकांची लागवड करताना बुंध्यापासून २ मी. अंतर सोडून मधल्या जागेत आंतरपिके घ्यावीत.
- शेवरकंद आंतरपीक म्हणून लागवड करताना ९० सें.मी. अंतरावर सऱ्या करून लागवड करावी.
- वडीच्या अळूसाठी नेहमीच्या ७५ बाय ७५ सें.मी. अंतरापेक्षा जवळ लागवड करावी.
- घोरकंद लागवड करताना २०० ते २५० ग्रॅम वजनाचे बेणे नारळ झाडाच्या सभोवती २ मी. अंतरावर आळे करून त्याच्या वरंब्यावर लागवड करावी. घोरकंदाच्या वेली नारळाच्या सर्व बाजूंनी दोरीच्या साह्याने आधार देत चढवाव्यात.

ड) सुरण, अरारुट, भाजीचा अळू हे मधल्या मोकळ्या निचऱ्याच्या जागेत खड्डे करून लागवड करावी व नंतर भर घ्यावी.

- सुपारी बागेतही झाडांच्या मधल्या उपलब्ध जागेत सुरण, अरारुट व वडीचा अळू या पिकांची लागवड करता येते, तर घोरकंदाच्या वेली सुपारीवर चौकट करून त्यावर चढविता येणे शक्य आहे.
- केळी व पपई या पिकांचा कालावधी १० ते १२ महिन्यांपर्यंत असतो. या बाबींचा विचार करून सुरण, वडीचा अळू, याम्स यासारख्या पिकांची आंतरपिके म्हणून लागवड केल्यास शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर ठरू शकतात.
- चिकू बागेत कंदपिकांची लागवड करताना चिकूच्या विस्ताराच्या बाहेरील बाजूने आळे करून त्यावर वडीचा अळू किंवा सुरण यासारखी पिके वरंब्यावर किंवा मधल्या जागेत लागवड करणे शक्य आहे.

☎ : ०२३५८-२८०२३८

**(कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली)**



**लुसलुशीत, पौष्टिक चाऱ्यासाठी बरसीम हे द्विदलवर्गीय चारापिकाची लागवड करावी.**

>> शेळीपालन

# शेळ्यांसाठी कोणता चारा वापरावा ?

– **सुरेश गावडे**, तारळे, जि. कोल्हापूर

साधारणपणे शेळ्यांना प्रतिदिन अडीच किलो हिरवा चारा व पाचशे ग्रॅम वाळलेला चारा लागतो, त्याचप्रमाणे शेळ्यांच्या खाद्यामध्ये हादगा, बोर, बाभूळ, आपटा, पिंपळ, चिंच, तुती पानांचा समावेश करावा. त्याचबरोबर गाभण शेळी, दूध देणारी शेळी, पैदाशीच्या बोकडासाठी पूरक आहाराची आवश्यकता असते.

शेळीपालनात शेळ्या दिवसभर चरण्यासाठी सोडल्यामुळे अतिरिक्त आहाराची तितकीशी आवश्यकता भासत नाही; मात्र बंदिस्त शेळीपालनासाठी चाऱ्याचे वार्षिक नियोजन करणे आवश्यक आहे. कडवळ, गजराज, बरसीम, लसूण घास, मका इ. एकदल व द्विदल पिकांची लागवड करावी; त्याचप्रमाणे वाळलेल्या चाऱ्याकरिता कडबा, गहू, सोयाबीन, तांदळाचा कोंडा, उडदाच्या भुशाचा वापर करावा.

☎ : ०२४२६- २४३४५५

**संगमनेरी शेळी संशोधन योजना, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी.**





शाश्वत शेती, स्मार्ट शेती आणि ग्रामीण विकास परिषद

१ ऑक्टोबर २०१८, सकाळी ९ ते संध्याकाळी ६.३०

एपी ग्लोबाले समुहाच्या पुढाकाराने आयोजित या परिषदेचा मुख्य हेतू शेतकऱ्यांना शाश्वत कृषी विकास आणि समूह पध्दतीने सर्वांगीण ग्रामीण विकास यांचे मार्गदर्शन आणि कौशल्यविकास हा आहे. या परिषदेत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासोबतच शेतकऱ्यांना छोट्या समुहांमध्ये प्रत्यक्ष तज्ज्ञांशी चर्चा करून समस्यांवर उत्तरे शोधण्याची संधी प्राप्त होणार आहे. राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठानशी संबंधित असणाऱ्या संशोधकांचे नावीन्यपूर्ण संशोधनही या प्रसंगी प्रत्यक्ष पाहायला मिळणार आहे. तसेच कृषी क्षेत्रातील नवउद्योजकही (स्टार्ट अप) या परिषदेत सहभागी होणार आहेत.

परिषदेतील मुख्य विषयः

- कौशल्य विकास
- स्मार्ट शेती
- सामुहिक शेती
- शाश्वत शेती
- ग्रामीण विपणन
- समुह पध्दतीने सर्वंकष ग्रामीण विकास
- कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधन
- सुरक्षा
- स्टार्ट अप उद्योजकांचा संभाव्य गुंतवणुकदारांशी संवाद
- नवीन प्रवाह आणि तंत्रज्ञान
- गटचर्चेमध्ये बियाणे, पिके, माती इ. विषयांवर विचारमंथन
- आदर्श शेती पध्दती

सन्माननीय उपस्थितीः

संभाजी पाटील निलंगेकर
कौशल्य विकास, कामगार आणि भूकंप पुनर्वसन मंत्री

श्वेता शालिनी
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र व्हिलेज सोशल ट्रान्सफॉरमेशन फाउंडेशन, महाराष्ट्र सरकार

डॉ.व्यंकट मायंदे
माजी कुलगुरू, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

डॉ.सुधीरकुमार गोयल
निवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव (कृषी), महाराष्ट्र राज्य

अधिक माहिती, नावनोंदणीसाठी संपर्कः ८६६९६८९०१७
पार्टनरशीपसाठी संपर्कः ९८१९७४९४९८
info@krishiculture.in
www.krishiculture.in

परिषदेचे ठिकाणः डेक्कन कॉलेज, डेक्कन कॉलेज रोड, लाईन बाजार, येरवडा, पुणे, महाराष्ट्र ४११००६

A part of APGLOBALE group company

राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान – भारत
National Innovation Foundation - India
MACCIA 100
CHATUR IDEAS


>> प्रक्रिया उद्योग

# सुधारित पद्धतीने गूळ उत्पादन कसे करावे ?

– **पी. एस. माने**, चंदगड, जि. कोल्हापूर



ऊस गाळपासाठी आडव्या तीन लाट्यांचा, स्वच्छता आणि सुरक्षेच्या दृष्टीने गिअर बॉक्स असलेल्या चरक्याची निवड करावी.

- गुऱ्हाळासाठी चरक्याची गाळप क्षमता ६५ ते ७० टक्क्यांपर्यंत असावी. गाळप वाढल्यास सूक्ष्म कचऱ्याचे प्रमाण वाढते, रसातील सुक्रोजचे प्रमाण वाढते; परंतु खनिजे आणि ग्लुकोजचे प्रमाण कमी होते, त्यामुळे गुळाचे औषधी महत्त्व कमी होते.
- स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण वातावरणात गूळ तयार करण्यासाठी स्टेनलेस स्टील चरख्याचा वापर करावा.
- द्विस्तरीय पद्धतीच्या गाळणीतून रस चांगला गाळून घेऊन 'फूड ग्रेड'चे प्लॅस्टिक अथवा स्टीलच्या नळीतून मंदानात घ्यावा. मंदानातील स्वच्छ रस पंपाच्या साह्याने प्लॅस्टिकच्या अथवा स्टीलच्या साठवण हौदात स्थिरीकरणासाठी ठेवावा.
- हौदातून स्वच्छ रस नायलॉनच्या गाळणीतून गाळून तो काहिलीत पुढील प्रक्रियेसाठी घ्यावा.
- रस उकळण्यासाठी सुधारित काहिलीचा वापर करावा. रस उकळण्यासाठी कोल्हापूर पद्धतीचे चिमणी चुलाण वापरावे. चुलाणावरून काहिल उतरण्यासाठी 'फ्रेम-चाके-रूळ' यांचा समावेश असलेली यांत्रिक पद्धत वापरावी.

☎ : ०२३१- २६५१४४५

**प्रादेशिक ऊस आणि गूळ संशोधन केंद्र, कोल्हापूर**


सकाळ अॅग्रोवन — आयोजित
Biofit नेटसर्फ कम्युनिकेशन्स प्रा. लि. — प्रायोजित

सकाळ अॅग्रोवन संवाद

'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

शुक्रवार, २४ ऑगस्ट २०१८ रोजी

विषय – ऊस उत्पादन वाढ तंत्रज्ञान
वक्ते – श्री. नारायण निबे
(कृषी विद्या, केव्हीके, दहिगाव- ने)
स्थळ – श्रीकृष्ण लॉन्स्, नागेश्वर मंदिर रोड, श्रीकृष्णनगर, मु.पो. भेंडा बु, ता. नेवासा, जि. अहमदनगर
वेळ – सकाळी ८.३० वा.

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.